ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २४ वे • अंक २०७ • शुक्रवार दि.१५ मे २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.

## बेताल वक्तव्य खपवून घेतली जाणार नाहीत

### सुप्रीम कोर्टाचे ठाकरे सेनेवर ताशेरे;३० जुलैला पुढील सुनावणी



नवी दिल्ली: शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्ह प्रकरणावरील याचिकां संदर्भात होणारी बेजबाबदार वक्तव्य खपवून घेतली जाणार नाहीत. असे ठणकावून सांगत आज सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी उद्धव ठाकरे गटाचे वकील देवदत्त कामत यांना माध्यमांमधील वक्तव्यांवरून कठोर शब्दांत सुनावले. तसेच या प्रकरणाची पुढील सुनावणी ३० जुलै रोजी होणार असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण या निवडणूक चिन्हा संदर्भात गेल्या अनेक वर्षांपासून सर्वोच्च न्यायालयात याचिका प्रलंबित आहे. आज या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात सरन्यायाधीश सुर्यकांत यांच्या खंडपीठासमोर सुनावणी ठेवण्यात आली होती. यावेळी उद्धव ठाकरे यांच्या वतीने वरिष्ठ वकील देवदत्त कामत यांनी न्यायालयाकडे प्रकरणाची लवकर सुनावणी घेण्याची विनंती केली. गेली तीन वर्षे हे प्रकरण प्रलंबित असल्याने त्यावर तातडीने सुनावणी होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. त्यावर सरन्यायाधीशांनी नाराजी व्यक्त करत, सर्वप्रथम तुमच्या लोकांना माध्यमांसमोर जाऊन सर्वोच्च न्यायालय निर्णय देत नाही, अशी बेजबाबदार वक्तव्ये करण्यापासून थांबवा, असे स्पष्ट शब्दांत फटकारले. सुनावणीदरम्यान सरन्यायाधीश म्हणाले की, न्यायालयात एक भूमिका मांडायची आणि बाहेर जाऊन वेगळी विधाने करायची, हे योग्य नाही. तुम्ही येथे येऊन लवकर सुनावणीची मागणी करता आणि बाहेर जाऊन सर्वोच्च न्यायालय निर्णय देत नाही, असे म्हणता. शब्दांचा वापर जपून करा. आम्ही अशा प्रकारचे वर्तन सहन करणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.यावर देवदत्त कामत यांनी वकिलांचा अशा विधानांना कधीही पाठिंबा नसल्याचे स्पष्ट केले. हे प्रकरण दोन-तीन तासांत पूर्ण होऊ शकते. न्यायालयाला वेळ मिळेल तेव्हा आम्ही तयार आहोत. आम्ही पान ४ वर

## मान्सून केरळात २६ मे तर राज्यात ७ जूनला धडकणार

### हवामान विभागाचा अंदाज



मुंबई/प्रतिनिधी-प्रचंड उकाडा आणि वाढत्या तापमानाने हैराण झालेल्या महाराष्ट्रातील नागरिकांसाठी मोठा दिलासा देणारी बातमी समोर आली आहे. भारतीय हवामान विभागाने यंदाचा नैऋत्य मान्सून वेळेआधी सक्रिय होत असल्याचा अंदाज व्यक्त केला असून, २६ मे रोजी मान्सून केरळात दाखल होण्याची शक्यता वर्तवली आहे. त्यानंतर जूनच्या पहिल्या आठवड्यात मान्सून महाराष्ट्रात प्रवेश करेल, असा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, ५ जूनपर्यंत मान्सून गोव्यात पोहोचण्याची शक्यता असून ६ जूनपर्यंत तो कोकण किनारपट्टीवर दाखल होऊ शकतो. त्यानंतर ७ जूनपर्यंत पुणे आणि पश्चिम महाराष्ट्रात मान्सूनची हजेरी लागण्याचा अंदाज आहे. त्यामुळे कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील शेतकऱ्यांमध्ये आशेचे वातावरण निर्माण झाले आहे.राज्यात सध्या अनेक भागांत उष्णतेची तीव्र लाट कायम असून तापमानात मोठी वाढ झाली आहे. विशेषतः पान ४ वर

## उर्वरित शेतकऱ्यांचा पिक विमा तात्काळ द्या

### देगलूरात संतप्त शेतकऱ्यांचे धरणे आंदोलन



देगलूर/प्रतिनिधी-खरीप-२०२५ चा पिक विमा एप्रिल महिन्यात मंजूर झाल्याची घोषणा करण्यात आली असली, तरी देगलूर तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांच्या खात्यात अद्याप एक रुपयाही जमा झालेला नाही. विशेषतः मरखेल, देगलूर आणि खानापूर महसूल मंडळातील शेतकरी पिक विम्यापासून वंचित राहिल्याने संतप्त शेतकऱ्यांनी काँग्रेसचे जिल्हा प्रवक्ते तथा शेतकरी नेते कैलास येसगे कावळगावकर यांच्या नेतृत्वाखाली उप-जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे आंदोलन छेडले.

यावेळी कृषी व महसूल प्रशासन तसेच विमा कंपनीच्या प्रतिनिधींना सविस्तर निवेदन देण्यात आले. उर्वरित शेतकऱ्यांचा पिक विमा तात्काळ अदा करण्यात यावा, अन्यथा अधिक उग्र आणि आक्रमक आंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला. याशिवाय आगामी खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना खत व बियाणे योग्य दरात उपलब्ध करून देण्याची मागणीही करण्यात आली.आंदोलनाची दखल घेत नायब तहसीलदार विलास तेलंग यांनी पुढाकार घेत कृषी अधिकारी एम. जी. सोनकांबळे व विमा कंपनीच्या प्रतिनिधींसोबत तातडीची बैठक घेतली. पुढील आठवडाभरात शेतकऱ्यांना पिक विम्याचे वाटप करण्याबाबत सकारात्मक चर्चा झाल्याचे सांगण्यात आले.या धरणे आंदोलनात कैलास येसगे कावळगावकर यांच्यासह जयदीप वरखिंडे, महेश पाटील, भरत पाटील, अरविंद देशमुख, व्यंकट पाटील झरीकर, उमेश पाटील आडलूरकर, भास्कर पाटील, मुन्ना भोकसखेडकर, भागवत सोमूरकर, विलास रेड्डी यालावार, निशिकांत कांबळे, दिलीप मरकंटे, सुभाष अल्लापुरकर, यादवराव बोरगावकर, गोपाळ मोरे, सुधाकर जबडे, बाळासाहेब बाबरे, श्रीपत बोडके, सुनील शिंदे, योगेश थडके, बालाजी पाटील डुकरे, गोविंद कोठारे, विठ्ठलराव भोसले, बालाजी वळंकीकर, बंडू बिरादार, शिवलिंग येसगे, बसवंत पटणे, शिवाजी बिरादार, माधव लगडे, सदाशिव वरखिंडे, नंदकिशोर पाटील, प्रशांत पाटील, माधवराव पाटील, रामराव मोरे, बळीराम बामणे, मारुती पाशमवार, सुभाष वद्येवार यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

## नीटची पुनर्परीक्षा २१ जूनला

### एनटीएकडून घोषणा,विद्यार्थ्यांमध्ये संताप

नवी दिल्ली: वैद्यकीय शिक्षणासाठी घेण्यात येणाऱ्या प्रवेश पूर्व परीक्षेचे पेपर लिक झाल्यामुळे एनटीएने यापूर्वी घेतलेली परीक्षा रद्द केली होती. ही परीक्षा आता रविवार दि.२१ जूनला होणार असल्याची घोषणा नीटच्यावतीने करण्यात आली आहे. पेपरफुटी प्रकरणात विद्यार्थी व पालकांकडून देशभर संताप व्यक्त केला जात आहे. पुढील परीक्षेची तारीख घोषीत झाल्याने विद्यार्थ्यांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे.

गेल्या काही दिवसांपासून देशभरात गाजत असलेल्या पेपरफुटी प्रकरणानंतर ही महत्त्वाची घोषणा करण्यात आली आहे. ३ मे २०२६ रोजी देशभरातील तब्बल २२ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी नीट परीक्षा दिली होती. मात्र, परीक्षेच्या अवघ्या ४८ तास आधी प्रश्नपत्रिका फुटल्याची माहिती समोर आल्यानंतर संपूर्ण देशभरात खळबळ उडाली होती. यानंतर १२ मे रोजी एनटीएने परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला होता. महाराष्ट्रातील नाशिक, अहिल्यानगर आणि पुणे जिल्ह्यांमधून काही प्रमुख आरोपींना अटक करण्यात आली असून, यामध्ये एका महिलेचाही समावेश असल्याची माहिती तपास यंत्रणांकडून देण्यात आली आहे. या प्रकरणाचे धागेदोरे महाराष्ट्रासह इतर राज्यांतही पोहोचल्याने चौकशी अधिक वेगाने सुरू आहे.दरम्यान, परीक्षा रद्द झाल्यानंतर विद्यार्थ्यांसमोर अनेक प्रश्न निर्माण झाले होते. पुनर्परीक्षेसाठी पुन्हा अर्ज करावा लागणार का? परीक्षा शुल्क भरावे लागणार का? परीक्षा नेमकी कधी होणार? अशा अनेक चर्चांना उधाण आले होते. मात्र, एनटीएने अधिकृत घोषणा करत २१ जून रोजी पुनर्परीक्षा घेण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे.एनटीएने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्स वरील अधिकृत खात्यावरून ही माहिती जाहीर केली. उमेदवार आणि पालकांनी केवळ एनटीएच्या अधिकृत माध्यमांवरच विश्वास ठेवावा, असे या पोस्टमध्ये नमूद करण्यात आले आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या शंकानिरसनासाठी हेल्पलाईन क्रमांकही उपलब्ध करून देण्यात आला आहे.या पार्श्वभूमीवर गुरुवारी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या निवासस्थानी उच्चस्तरीय बैठक पार पडली.

### राजू शेट्टींना फरफटत नेलं,जानकरांना उचलून नेलं;मुंबईत घमासान

मुंबई/प्रतिनिधी-आपल्या विविध मागण्यासाठी आंदोलन करणाऱ्या कोकणातील काजू आणि आंबा उत्पादकांना पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. यामध्ये शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, शेकापचे जयंत पाटील, शिवसेनेचे माजी खा.विनायक राऊत, महादेव जानकर आणि इतर नेत्यांनाही पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. त्यामुळे पान ४ वर



काँग्रेसच्या नेत्या प्रा.ललिता कुंभार यांच्या पुढाकारातून प्रभाग क्र.१० मधील महिलांसाठी एस.टी.प्रवासाचे स्मार्ट कार्ड तयार करण्यात आले आहे. या कार्डाचे वाटप करतांना पाटीदार समाजाचे ज्येष्ठ किशनभाई पटेल, शांतीभाई पटेल, अॅड. प्रदीप नागापूरकर, प्रा.ललिता कुंभार, कमलबाई गवळे, भारती विलास पाटील, घोरबांड आदी दिसत आहेत.

## किनवटमध्ये अवैध गौणखनिज माफियांना अभय?,तहसील प्रशासनावर संगनमताचे आरोप

### महसूल मंत्र्यांच्या आदेशालाही केराची टोपली?,पांधराचे सरपंच,उपसरपंचासह ग्रामस्थांचे उपोषण



**बी.एल.कागणे**
**किनवट तालुका विविध वार्तापत्र**

किनवट:अवैध उत्खनन केलेल्या मुरुमाची विनापरवाना वाहतूक करीत असताना किनवट महसूल विभागाच्या पथकाने १२ मे च्या रात्री बारा वाजताचे आसपास मुद्देमालासह रंगेहाथ पकडले. दुर्दैव असे की, पथकाला माहिती मिळाल्यावरुनच राष्ट्रीय महामार्गावरील राजगड परिसरात जाऊन त्यांनी एम.एच.-सी.के. क्रमांकाचा हायवा गाडीवर जप्तीची कारवाई करुन तहसील कार्यालयात लावलीय. या कारवाईसाठी जिल्हा अधिकारी, सहाय्यक जिल्हाधिकारी आणि तहसीलदार यांचे मार्गदर्शन लाभल्यामुळेच कारवाई केलीय.

महसूल विभागाने नेहमीच डोंगर पोखरून उंदीर काढण्यापेक्षा ग्राम महसूल अधिकारी आणि मंडळ अधिकाऱ्यांनी आपापल्या सज्जावर बारमाही मुक्कामी राहाणे अनिवार्य केल्यास गौणखनिजाचे अवैध उत्खनन आणि विनापरवाना होणाऱ्या वाहतुकीवर आळा बसेल असा पर्यावरणप्रेमींचा सल्ला आहे. १२ मे च्या रात्री राजगड ते किनवट दरम्यानच्या राष्ट्रीय महामार्गावर मुरुम वाहतूक करणारा एम.एच.२६-सी.के.२४८७ या क्रमांकाचा हायवा हरीश यादव, शुभम जेलेवाड, अजय लहानकर, आकाश राजखोले या महसूल पथकाच्या हाती लागला. तहसील कार्यालयात जप्त करून हायवा आणून लावला. आता तो मुरुम कोणत्या खदानीतून आणला? त्या ठिकाणचे मोजमाप केल्यानंतरच दंडात्मक कारवाई निश्चित करावी लागणार आहे. जप्त केलेला हायवा कायम जप्त करून फौजदारी कारवाई करण्यात येईल का? महसूल मंत्र्यांनी या संदर्भात केलेल्या आदेशाचे अनुपालन होणार का? की, पळवाटा शोधून हायवा सोडणार? ते पहायला मिळणार आहे.

**सहा.जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सरपंच, उपसरंचाचे उपोषण**

पांधरा येथील पैनगंगेच्या पात्रातील रेती घाटातून जवळपास वीस ट्रॅक्टरने रात्रंदिवस अवैध रेतीचा उपसा करून रेती चोरीचा उद्योग चालतोय. ग्रामस्थ वैतागल्याने शुक्रवार १५ मे पासून सरपंच, उपसरपंच आणि ग्रामस्थांनी उपोषणाला सुरुवात केली आहे. अवैध रेती बंद करण्याच्या मागणीचे पत्र ३० मार्च रोजीच सहाय्यक जिल्हाधिकारी, तहसीलदार आणि किनवट पोलीसांना दिले. तब्बल दिड महिना लोटला तरी कोणत्याही अधिकाऱ्यांना अवैध रेती व्यवसाय रोखविण्याची गरज वाटली नाही. म्हणून उपोषणाला सुरुवात केली आहे.

आजही राजरोसपणे कोणाचीही भीती न बाळगता अवैध रेती चावतेय. म्हणून आता पेसा कायद्यांतर्गतच्या पांधरा गावाचे सरपंच दत्तात्रय परसराम कऱ्हाळे, उपसरपंच नितीश देवराव अंभोरेंसह पांधराकरांच्या आंदोलनाचे पत्र दिले आहे.दरम्यान प्रशासनाने का कारवाई केली नाही ? ग्रामस्थांच्या ओरडबोंबीला फारसे महत्त्व दिले नाही. तुम्ही करा वटवट आम्ही आहोत निगरगट्ट याचा प्रत्यय यातून पहायला मिळाला. म्हणजेच रेती चोरीला त्यांचे थेट समर्थन असावे असा अनुमान लावायला काहीच अडचण येणार नाही. मुळात तुम्ही तुमच्या सज्जावर इमानदारीपुर्वक सेवा बजावली तर अवैध धंदे चालतील असे वाटत नाही. तुम्ही राहाता तालुका अथवा जिल्ह्याला. मग हा खेळ तर चालणारच. प्रशासनाची चमडी वाचविण्यासाठी अशी एखादी कारवाई दाखवावी लागते, कारण लोकांची आणि माध्यमांची ओरड झालेली असते. महसूल मंत्र्यांच्या आदेशाला केराची टोपली दाखवत अवैध धंदे चालवली जात आहेत. त्यावरूनच मंत्री कमजोर अन अवैध धंदेचालक शिरजोर आणि यंत्रणा मात्र दमदार ? पान ४ वर

# देशभक्तीचे हे वादळ

**आखाती देशातील अमेरिका-इराण-इराक यांच्यात गेल्या तीन महिन्यांपासून सुरू असलेल्या युद्धाने संपूर्ण जगाची झोप उडवली आहे. युद्ध विरामासाठी अनेक प्रयत्न झाले, परंतु कोणताही देश माघार घेण्यास तयार नसल्याने संघर्ष अधिक तीव्र होत चालला आहे. या युद्धाचा परिणाम केवळ रणांगणापुरता मर्यादित राहिलेला नाही; त्याच्या झळा जगभरातील अर्थव्यवस्थांना बसत आहेत. पेट्रोलियम पदार्थांच्या पुरवठ्यावर अवलंबून असलेल्या देशांसाठी ही परिस्थिती अधिकच गंभीर ठरत आहे. भारतासारख्या विकसनशील देशालाही या संकटाचा फटका बसू लागला आहे.युद्ध सुरू झाल्यानंतर देशात पेट्रोल-डिझेल आणि घरगुती गॅसच्या तुटवड्याची भीती निर्माण झाली. संसदेच्या अधिवेशनातही या विषयावर चर्चा झाली. सरकारने तातडीच्या उपाययोजना करत पुरवठा सुरळीत ठेवण्याचा प्रयत्न केला. मात्र या काळात देशातील पाच राज्यांच्या निवडणुका सुरू असल्याने सत्ताधारी प्रचारात व्यस्त होते की काय, अशी शंका नागरिकांच्या मनात निर्माण झाली. संकटाच्या काळात शासनाने जनतेत विश्वास निर्माण करणे अपेक्षित असते; परंतु राजकीय कार्यक्रमांच्या गर्दीत सामान्य माणसाच्या अडचणी दुय्यम ठरत असल्याचे चित्र दिसले. रविवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना काटकसरीचा सल्ला दिला. इंधनाचा कमी वापर करा, सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढवा, ऊर्जा बचत करा असे आवाहन त्यांनी केले. पण दुसऱ्याच दिवशी गुजरात दौऱ्यात मोठ्या वाहनताफ्यासह झालेल्या रोडशोमुळे विरोधकांना टीकेची संधी मिळाली. ''जनतेला पेट्रोल वाचवायला सांगायचे आणि स्वतः मात्र शेकडो वाहनांच्या ताफ्यात फिरायचे?'' असा सवाल उपस्थित झाला. त्यानंतर पंतप्रधानांनी स्वतःचा ताफा कमी केल्याचे सांगण्यात आले आणि देशभरात जणू देशभक्तीच्या नव्या मोहिमेलाच सुरुवात झाली. मुख्यमंत्री, मंत्री, खासदार, आमदार आणि सत्ताधारी कार्यकर्ते अचानक साधेपणाच्या स्पर्धेत उतरल्याचे दिसू लागले. कोणी मोटरसायकलवरून मंत्रालयात जाऊ लागले, कोणी आपल्या वाहनताफ्यात कपात केली, तर कोणी परदेशी इलेक्ट्रिक गाड्या मागवून पर्यावरणप्रेमाचे प्रदर्शन सुरू केले. गंमत म्हणजे सर्वसामान्य नागरिकांना इलेक्ट्रिक वाहनासाठी दोन-दोन महिने प्रतीक्षा करावी लागत असताना या मान्यवरांना ती काही तासांत उपलब्ध झाली. त्यामुळे हा पर्यावरणाचा विचार आहे की प्रसिद्धीचा शॉर्टकट?, असा प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे.या सगळ्या ''देशभक्तीच्या वादळात'' सर्वात लक्षवेधी प्रसंग ठरला तो देशाचे रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या बसप्रवासाचा. इंधन बचतीचा संदेश देण्यासाठी त्यांनी बसमधून प्रवास केल्याचा देखावा केला. माध्यमांमध्ये त्याचे मोठे कौतुकही झाले. परंतु या बसच्या पुढे-मागे सरकारी वाहनांचा मोठा ताफा धावत होता. त्यामुळे सामान्य नागरिकांच्या मनात प्रश्न निर्माण झाला की, हा खरोखर साधेपणाचा संदेश होता की; केवळ छायाचित्रांसाठी केलेला प्रयोग? एका बस प्रवासामागे दहा गाड्या धावत असतील, तर इंधनाची बचत नेमकी कुठे झाली?, हा उपरोधिक सवाल जनतेतून उपस्थित होऊ लागला.देशभक्ती ही केवळ दिखाव्याची गोष्ट नसते. ती कृतीतून, सातत्यातून आणि प्रामाणिकपणातून दिसली पाहिजे. मोटरसायकलवरून कार्यालयात जाणे, बसने प्रवास करणे किंवा ताफा कमी करणे या प्रतीकात्मक गोष्टी चांगल्या असल्या तरी त्या फक्त कॅमेऱ्यांसमोरच दिसत असतील तर त्यांचा अर्थ उरत नाही. सामान्य नागरिक मात्र आजही वाढत्या महागाईचा, इंधन दरांचा आणि रोजच्या खर्चाचा सामना करीत आहे. त्याच्यासाठी काटकसर ही प्रसिद्धीची संधी नसून जगण्याची गरज बनली आहे. युद्धाच्या संकटातून जगाला एक मोठा धडा मिळत आहे. ऊर्जा बचत, पर्यावरणपूरक जीवनशैली आणि संसाधनांचा जबाबदारीने वापर ही आता केवळ घोषणांची भाषा राहिलेली नाही; ती काळाची गरज बनली आहे. मात्र त्यासाठी नेतृत्वाने स्वतः उदाहरण घालून दिले पाहिजे. जनतेला संदेश देताना शासनकर्त्यांच्या कृतीत आणि शब्दांत सुसंगती असणे आवश्यक आहे. अन्यथा देशभक्तीचे हे वादळ काही दिवस गाजेल, फोटो आणि बातम्यांत झळकेल, पण नंतर शांत होईल. उरेल ती फक्त सामान्य माणसाची वाढती चिंता आणि राजकारणातील दिखावूपणाची कटू जाणीव.**

# ''क्रिप्टो फसवणूक:पारदर्शक ब्लॉकचेन पण गुंतागुंतीचा तपास''




सन २०१७ मध्ये सुमारे ५० ते ६० हजार रुपये दराने काही बिटकॉइन खरेदी करून, माझ्यासह नांदेड येथील काही गुंतवणूकदारांनी ''गेन बिटकॉइन'' या कँम्पनीमध्येशेकडो बिटकॉइन ची गुंतवणूक केली. संबंधित कँम्पनी बिटकॉइन मायनिंग करून त्यातून मिळणाऱ्या नफ्यातून गुंतवणूकदारांना परतावा देण्याचे करार करत होती.मात्र, काही काळानंतर कँम्पनीने नफा देणे बंद केले. बिटकॉइन परत देण्याऐवजी त्यांनी स्वतःची बनावट क्रिप्टोकरन्सी देण्यास सुरुवात केली. त्यामुळे गुंतवणूकदारांची मोठ्या प्रमाणावर फसवणूक झाली.या योजनेत पॉन्झी स्कीमचा वापर करण्यात आला होता. एजंट्स नेमून त्यांना बिटकॉइनमध्ये मोठ्या प्रमाणावर कमिशन दिले जात होते. नेटवर्क मार्केटिंगच्या साखळी पद्धतीद्वारे स्थानिक एजंट्स लोकांना आकर्षक आमिष दाखवून, बिटकॉइन मायनिंगचे खोटे व आकर्षक चित्र उभे करून मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करून घेत होते.फसवणूक झाल्यानंतर तक्रार करण्यासाठी पोलीस स्टेशनमध्ये गेल्यावर वेगळाच अनुभव आला. तेथील अधिकाऱ्यांना बिटकॉइनबद्दल पुरेशी माहिती नव्हती. त्यामुळे थेट आयपीएस एसपी साहेबांची भेट घेऊन, सुमारे ८ महिन्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांनंतर नांदेड येथे गेन बिटकॉइन प्रकरणाची भारतातील पहिली एफआयआर नोंदवण्यात आली.

तथापि, तपास पुढे कसा न्यायचा हा मोठा प्रश्न होता. स्थानिक आरोपींना अटक झाली, पण त्यांना न्यायालयातून लवकर जामीन मिळत होता. तपास अधिकाऱ्यांकडून तांत्रिक तपास आणि पुरावे सादर करण्यात मर्यादा जाणवत होत्या. त्यामुळे क्रिप्टो गुन्ह्यांच्या तपासात एक मोठी पोकळी असल्याची जाणीव झाली. गेन बिटकॉइन प्रकरणात भारतातून ३ लाखांहून अधिक बिटकॉइन गोळा करून त्याचा अपहार करण्यात आला होता. या प्रकरणाचा सखोल अभ्यास करताना, बिटकॉइन आणि ब्लॉकचेन क्षेत्रातील ज्ञान वाढवण्यावर मी लक्ष केंद्रित केले. या अभ्यासाच्या आधारे, विविध प्रकरणांमध्ये माझ्या ज्ञानाचा उपयोग करून शेकडो बिटकॉइनचा मुद्देमाल शोधून काढण्यात आणि तो शासकीय खात्यात जमा करण्यात मदत झाली आहे. सदर प्रकरणाचा तपास २०१७ पासून आज २०२६ पर्यंत सुरू आहे. तपासाची गती संथ असली, तरी तपास अधिकाऱ्यांना तांत्रिक आणि ब्लॉकचेन विषयक मार्गदर्शन देत राहणे हेच माझे ध्येय आहे.या काळात तपास अधिकाऱ्यांची कार्यपद्धती, त्यांचे मर्यादित ज्ञान, तसेच तपासातील गुंतागुंतीच्या बाबी यांचा सखोल अभ्यास केला. त्यातून एक गोष्ट स्पष्ट झाली.भारतामध्ये आजही क्रिप्टो गुन्हा झाल्यास, पीडित व्यक्तीचे पैसे परत मिळण्याची शक्यता अत्यंत कमी आहे. तपासामध्ये अपेक्षित प्रगती होत नाही.ही पोकळी भरून काढण्यासाठी मी निस्वार्थ भावनेने सतत कार्यरत आहे. फसवणुकीत गेलेले बिटकॉइन शोधून काढण्यासाठी दिवस-रात्र प्रयत्न करत आहे. भविष्यात तपासामध्ये मोठ्या प्रमाणावर बिटकॉइन जप्त करण्यात यश मिळेल, असा विश्वास आहे.माझ्या कार्याची दखल घेऊन प्रशासनाकडून वेळोवेळी प्रशस्तीपत्र देण्यात आले आहेत. मात्र,अधिकाऱ्यांनी स्वतः क्रिप्टो गुन्ह्यांच्या तपासात निपुण व्हावे आणि गुंतवणूकदारांचे संरक्षण व्हावे, या उद्देशाने हा लेख सादर केला आहे.

### समस्या आणि वास्तव

आजच्या डिजिटल युगात क्रिप्टोकरन्सीने आर्थिक व्यवहारांची पद्धत बदलली आहे. मात्र, याच तंत्रज्ञानाचा वापर करून मोठ्या प्रमाणावर फसवणूकही वाढताना दिसत आहे. एखादा नागरिक क्रिप्टो फसवणुकीची तक्रार घेऊन पोलीस ठाण्यात गेल्यास त्याला पहिलाच प्रश्न विचारला जातो ''क्रिप्टो म्हणजे काय?'' आणि इथूनच त्याच्या त्रासाची सुरुवात होते.तक्रारदाराला विविध प्रश्न विचारले जातात, त्यानंतर सायबर विभागाकडे पाठवले जाते. पण तिथेही कोणताही ठराविक अर्ज नमुना नसल्यामुळे प्रक्रिया अधिक गुंतागुंतीची बनते. अधिकाऱ्यांकडे मर्यादित ज्ञान असल्यामुळे तपास लांबणीवर पडतो. क्रिप्टो गुन्हे पारंपरिक आर्थिक गुन्ह्यांपेक्षा अधिक तांत्रिक आणि वेगवान आहेत. वॉलेटमधून पैसे गायब होणे, बनावट कंपन्या, पॉन्झी स्कीम्स, रोमॅन्स स्कॅम्स हे सर्व प्रकार मोठ्या प्रमाणावर वाढले आहेत. मात्र, या गुन्ह्यांसाठी ठोस SOP (Standard Operating Procedure) नसल्यामुळे तपासात अडथळे निर्माण होतात.

### ब्लॉकचेन आणि क्रिप्टो समजून घेणे

ब्लॉकचेन हे एक वितरित (Distributed Ledger) तंत्रज्ञान आहे, जे सर्व व्यवहार पारदर्शक आणि सुरक्षित पद्धतीने नोंदवते. एकदा व्यवहार नोंदवला की तो बदलता येत नाही. यामुळेच ब्लॉकचेनला विश्वासार्ह मानले जाते.

### ब्लॉकचेनची वैशिष्ट्ये

पारदर्शकता, अपरिवर्तनीयता, सरक्षितता (क्रिप्टोग्राफी), मध्यस्थांशिवाय व्यवहार सोप्या भाषेत सांगायचे तर, ब्लॉकचेन म्हणजे जगभरातील संगणकांवर ठेवलेली डिजिटल पासबुक आहे.क्रिप्टोकरन्सी ही डिजिटल चलन असून ती विकेंद्रित नेटवर्कवर कार्य करते.

### महत्त्वाच्या क्रिप्टोकरन्सी:

बिटकॉइन (डिजिटलसोने), इथेरियम (स्मार्ट कॉन्ट्रॅक्ट्स), स्टेबलकॉइन्स (स्थिर मूल्य), ऑल्टकॉइन्स क्रिप्टो व्यवहार पूर्णपणे अनामिक नसतात, तर छद्म-ओळख (Pseudonymity) आधारित असतात. म्हणजे व्यवहार दिसतात, पण व्यक्तीची ओळख थेट दिसत नाही.क्रिप्टो गुन्हे आणि तपासातील अडचणी-क्रिप्टोचा वापर अनेक बेकायदेशीर क्रियाकलापांसाठी केला जातो.

### मुख्य गुन्हे प्रकार:

मनी लॉन्डरिंग (Mixing, Tumbling, Chain Hopping), गुंतवणूक फसवणूक (ICO Scams, Ponzi Schemes), रोमॅन्स स्कॅम्स, रॅन्समवेअर हल्ले, डार्क वेब व्यवहार, फिशिंग आणि मालवेअर हल्ले, गिव्हअवे आणि इम्पर्सोनेशन स्कॅम्स ''गेन बिटकॉइन'' सारख्या प्रकरणांमध्ये लाखो बिटकॉइनची फसवणूक झाली आहे, ज्याचा तपास मोठ्या यंत्रणांकडून सुरू आहे. तपासातील सर्वात मोठे आव्हान म्हणजे वेळ. क्रिप्टो व्यवहार काही मिनिटांत देशाबाहेर जातात. अनेकदा आरोपी कोल्ड वॉलेटमध्ये पैसे ठेवतात, ज्यामुळे त्यांचा मागोवा घेणे कठीण होते. तथापि, ब्लॉकचेनची पारदर्शकता तपासासाठी मोठा फायदा आहे. योग्य साधने वापरल्यास निधीचा प्रवाह काही मिनिटांत ट्रेस करता येतो.

**परवेन्द्रसिंघ सुरेंद्रसिंघ शाहू**
बी.कॉम,(ब्लॉकचेन,क्रिप्टो एनॅलिटिकस) मो.९८२३६१६९५५

**उपाययोजना आणि पुढील दिशा-**क्रिप्टो गुन्ह्यांचा प्रभावी तपास करण्यासाठी खालील गोष्टी अत्यंत आवश्यक आहेत.

**१. प्रशिक्षण आणि जागरूकता-**पोलीस व सायबर अधिकाऱ्यांना विशेष प्रशिक्षण ,क्रिप्टो आणि ब्लॉकचेनची सखोल माहिती, **२. आधुनिक साधनांचा वापर-**ब्लॉकचेन ॲनालिसिस टूल्स ,रिअल-टाइम ट्रॅकिंग, वॉलेट मॉनिटरिंग (Address Watch), **३. स्पष्ट SOP आणि प्रक्रिया-**तक्रार नोंदवण्यासाठी निश्चित फॉरमॅट ,तपासासाठी स्टँडर्ड मार्गदर्शक, **४. आंतरराष्ट्रीय सहकार्य-**एक्सचेंजेस आणि VASP सोबत संपर्क, KYC आणि AML नियमांचा वापर , **५. प्रतिबंधात्मक उपाय-**पॉन्झी स्कीम्सवर आधीच कारवाई , जनजागृती मोहिमा क्रिप्टो गुन्ह्यांमध्ये निधी परत मिळण्याचे प्रमाण सध्या खूप कमी आहे. मात्र, योग्य पद्धतीने तपास केल्यास आरोपींना पकडणे आणि काही प्रकरणांमध्ये रक्कम परत मिळवणे शक्य आहे.

**वॉलेट्स आणि पत्त्यांची ओळख-**क्रिप्टोकरन्सी व्यवहारांमध्ये प्रत्यक्ष नावांचा वापर होत नाही, तरीही हे व्यवहार पूर्णपणे अनामिक नसतात. प्रत्येक वापरकर्त्याजवळ एक डिजिटल वॉलेट असते, जे बँक त्यासारखे कार्य करते. या वॉलेटमध्ये क्रिप्टोकरन्सीची शिल्लक आणि सर्व व्यवहारांची नोंद ठेवली जाते.प्रत्येक वॉलेटला एक विशिष्ट पत्ता (Address) दिला जातो. हा पत्ता म्हणजे बँक खात्याच्या क्रमांकासारखा असून त्याद्वारे क्रिप्टोकरन्सी पाठवणे आणि स्वीकारणे शक्य होते. विशेष बाब म्हणजे, या पत्त्याशी संबंधित व्यवहारांचा इतिहास आणि काही माहिती सार्वजनिक ब्लॉकचेनवर उपलब्ध असते. त्यामुळे पूर्ण गुप्तता नसून पारदर्शकता आणि ट्रेसिंग शक्यता कायम राहते.

वेगवेगळ्या क्रिप्टोकरन्सींच्या पत्त्यांचे स्वरूप वेगळे असते. उदाहरणार्थ, बिटकॉइन पत्ते १, ३ किंवा bc1 ने सुरू होतात, इथेरियम पत्ते 0x ने सुरू होतात, तर ट्रॉन पत्ते T ने सुरू होतात. यावरून कोणत्या नेटवर्कवर व्यवहार झाला आहे हे ओळखता येते.

**तपासात क्रिप्टोकरन्सीची ओळख-**तपासादरम्यान कायदा अंमलबजावणी अधिकाऱ्यांना काही महत्त्वाचे संकेत मिळू शकतात. त्यापैकी सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे सीड फ्रेझ. ही १२ ते २४ शब्दांची मालिका असून ती वॉलेट पुनर्प्राप्त करण्यासाठी वापरली जाते. अनेकदा ती कागदावर लिहिलेली आढळते. याशिवाय विविध प्रकारची वॉलेट्स तपासणे आवश्यक असते:

**हार्डवेअर वॉलेट्स-**ही USB सारखी भौतिक उपकरणे असतात. Ledger आणि Trezor सारखी उपकरणे यामध्ये प्रसिद्ध आहेत.

**सॉफ्टवेअर वॉलेट्स-**संगणक किंवा मोबाईलमध्ये असलेली ॲप्स जसे की Electrum, Exodus, Trust Wallet किंवा Mycelium यांचा वापर तपासला जातो.

**वेब वॉलेट्स-**ब्राउझरद्वारे वापरली जाणारी वॉलेट्स, जसे Coinbase किंवा Blockchain आधारित सेवा, यांचा इतिहास आणि लॉगिन माहिती तपासली जाते.

**पेपर वॉलेट्स-**कागदावर छापलेले QR कोड किंवा कीज स्वरूपातील वॉलेट्सही आढळू शकतात.

याशिवाय वॉलेट्सचे प्रकार समजून घेणे महत्त्वाचे आहे:कोल्ड वॉलेट्स (इंटरनेटपासून वेगळे), हॉट वॉलेट्स (इंटरनेटशी जोडलेले)

**तपास साधने आणि ब्लॉकचेन विश्लेषण-**क्रिप्टोकरन्सी तपासाचा मुख्य उद्देश म्हणजे निधीचा प्रवाह शोधणे. यासाठी विविध साधने वापरली जातात.

ब्लॉकचेन एक्सप्लोरर्स Blockchain.com आणि Etherscan.io सारखी साधने व्यवहारांचा मागोवा घेण्यासाठी महत्त्वाची आहेत. यामध्ये व्यवहाराची वेळ, रक्कम आणि पत्त्यांची माहिती मिळते.

**फॉरेन्सिक साधने-**Arkham, CipherTrace आणि Breadcrumbs यांसारखी प्रगत साधने व्यवहारांचे दृश्य विश्लेषण, ट्रॅकिंग आणि रिपोर्टिंग सुलभ करतात. ही साधने संशयित वॉलेट्स आणि एक्सचेंजेसमधील संबंध उघड करतात.

**महत्त्वाची वैशिष्ट्ये-**रिअल-टाइम ट्रॅकिंग,क्रॉस-चेन तपास,ॲड्रेस वॉच सुविधा,प्रगत शोध क्षमता,डेटा निर्यात सुविधा ही साधने गुन्हेगारांच्या आर्थिक हालचालींचे सखोल विश्लेषण करण्यास मदत करतात.

**मालमत्ता ट्रेसिंग पद्धती-**क्रिप्टोकरन्सी तपासात निधी अनेक वॉलेट्समध्ये विभागला जातो आणि लपवला जातो. अशावेळी विविध ट्रेसिंग पद्धती वापरल्या जातात:

PIFO (Proceeds-In-First-Out): आधी असलेली रक्कम वैध मानून नंतर आलेल्या निधीचा मागोवा घेतला जातो. LIBR (Lowest Intermediate Balance Rule): शिल्लक कमी झाल्यावर बेकायदेशीर निधी अस्तित्वात मानला जातो. FIFO (First-In-First-Out): प्रथम आलेला निधी प्रथम बाहेर जातो असे गृहित धरले जाते. LIFO (Last-In-First-Out): शेवटी आलेला निधी प्रथम बाहेर जातो असे मानले जाते. Matching Transactions: विशिष्ट रक्कम अल्प कालावधीत हलवली गेल्यास ती संशयास्पद मानली जाते.

कायदेशीर प्रक्रिया आणि KYC/AML नियम-क्रिप्टो एक्सचेंजेसना KYC (Know Your Customer) आणि AML (Anti-Money Laundering) नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे. त्यामुळे:-ग्राहकांची ओळखपत्रे आणि फोटो गोळा केले जातात, व्यवहारांवर देखरेख ठेवली जाते, संशयास्पद व्यवहारांचे अहवाल तयार केले जातात, कायदा अंमलबजावणी संस्था समन्सद्वारे ही माहिती मिळवू शकतात. यामध्ये खझ लॉग, व्यवहार इतिहास, खाते तपशील आणि संवाद नोंदींचा समावेश असतो.

### क्रिप्टो पुरावे हाताळण्याची पद्धत

क्रिप्टोकरन्सी जप्त करताना ती प्रत्यक्ष उपकरणात नसून ब्लॉकचेनवर अस्तित्वात असते. त्यामुळे:-उपकरणे सुरक्षित ठेवणे (irplane mode / Faraday bag), वॉलेटमधील निधी अधिकृत वॉलेटमध्ये हलवणे,पुराव्याची अखंडता (chain of custody) राखणे,डिजिटल सुरक्षा प्रक्रिया पाळणे हे अत्यंत आवश्यक आहे.

क्रिप्टोकरन्सी तपास हे आधुनिक कायदा अंमलबजावणीसाठी एक गुंतागुंतीचे पण अत्यावश्यक क्षेत्र बनले आहे. योग्य साधने, तांत्रिक ज्ञान आणि कायदेशीर प्रक्रिया यांच्या समन्वयानेच डिजिटल गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवणे शक्य आहे. ब्लॉकचेनची पारदर्शकता ही या तपास प्रक्रियेची सर्वात मोठी ताकद असून, योग्य वापर केल्यास ती गुन्हेगारी नेटवर्क उघड करण्यास अत्यंत प्रभावी ठरते.आज गरज आहे ती भय किंवा अज्ञानाची नव्हे, तर तयारी, प्रशिक्षण आणि इच्छाशक्तीची.

तेव्हाच डिजिटल युगातील नागरिकांना खऱ्या अर्थाने न्याय मिळू शकेल. क्रिप्टो संबंधित गुन्ह्यांबद्दल जागरूकता व संरक्षण संबंधी माझे नेहमी प्रयत्न चालू राहतात ह्या साठी अधिक माहिती साठी वाचक मला थेट संपर्क करू शकतात.

# आ.राजेश पवार यांच्या कार्यालयात छ.संभाजी महाराज यांची जयंती साजरी

नायगाव/प्रतिनिधी- नायगाव विधानसभा मतदारसंघाचे आ.राजेश पवार यांच्या नायगाव येथील जनसंपर्क कार्यालयात धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या शौर्य, पराक्रम आणि धर्मरक्षणासाठी दिलेल्या बलिदानाचा गौरवपूर्ण उल्लेख करत त्यांच्या विचारांवर चालण्याचा संकल्प व्यक्त केला. यावेळी आ.राजेश पवार मित्र मंडळाचे देविदास अण्णा बोबनाळे, राजेश पाटील हंबर्डे, प्रतिभाताई धानोरकर, पल्लवीताई वडजे, माधव पाटील चितले, बळीराम पाटील वडजे, अवकाश पाटील धुपेकर, राजू पाटील बेळगे, माधव पाटील बेंद्रीकर, केशव पाटील हंबर्डे, गोविंद पाटील हंबर्डे, चक्रधर पाटील हंबर्डे, मनीष पाटील हंबर्डे, मारुती पाटील राहेरकार, ऋषिकेश पाटील कदम, रवी राठोड आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. घोषणांनी परिसर दणाणून गेला असून वातावरण भक्तीमय व उत्साहपूर्ण झाले होते.

# वीज ग्राहकांसाठी ग्राहक तक्रार निवारण मंच

नांदेड/प्रतिनिधी-महावितरणच्या नांदेड मंडलात ग्राहक तक्रार निवारण मंच (सीजीआरएफ) सुरु करण्यात आला आहे.या मंचाच्या माध्यमातून वीज ग्राहकांना त्यांच्या नवीन जोडण्या, वीज देयके, मीटर व वीज पुरवठ्या संबंधीच्या तक्रारी सादर करता येणार आहेत. तक्रारदार ग्राहकांनी त्यांच्या तक्रारी नांदेड ग्राहक तक्रार निवारण मंचाकडे महावितरणच्या संकेत स्थळावर नोंदविण्याचे आवाहन करण्यात येत आहे.नांदेड आणि परभणी मंडलासाठी जिल्हा परिषदेचे सेवानिवृत अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.अशोक कोल्हे यांची अध्यक्ष म्हणून नियूक्ती करण्यात आली आहे.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# इराण-अमेरिका युद्धाचा परिणाम:सरकारची रॉकेलची घोषणा हवेतच;हदगाव तालुक्यात अद्याप पुरवठा नाही

हदगाव/प्रतिनिधी-इराण-अमेरिका युद्धामुळे निर्माण झालेल्या इंधन संकटाचा परिणाम देशातील गॅस पुरवठ्यावरही होत असून, ग्रामीण भागातील नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. सिलेंडर टंचाईमुळे नागरिक त्रस्त झाल्यानंतर राज्य सरकारने ग्रामीण भागात रॉकेल (केरोसिन) पुरवठा करण्याची घोषणा केली होती. मात्र, घोषणा होऊन महिनाभर उलटूनही हदगाव तालुक्यातील अनेक गावांमध्ये अद्याप रॉकेल पोहोचले नसल्याने रॉकेल केव्हा मिळणार? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

गेल्या महिन्यात तसेच त्यापूर्वीही हदगाव तालुक्यात अनेक ठिकाणी गॅस एजन्सीसमोर ग्राहकांच्या मोठ्या रांगा लागल्या होत्या. अनेक नागरिकांना तासन्तास रांगेत उभे राहूनही सिलेंडर मिळत नव्हते. त्यामुळे महिलांसह सर्वसामान्य ग्राहकांची मोठी गैरसोय झाली होती. आजही ग्रामीण भागातील अनेक ठिकाणी वेळेवर गॅस सिलेंडर उपलब्ध होत नसल्याचे चित्र कायम आहे. सिलेंडर टंचाईबाबत सर्वसामान्य नागरिकांकडून तीव्र प्रतिक्रिया उमटू लागल्यानंतर राज्य सरकारने ग्रामीण भागासाठी रॉकेल वाटपाचा निर्णय जाहीर केला होता. रास्तभाव दुकानां मार्फत हा पुरवठा केला जाणार असल्याचे सांगण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात बहुतांश गावांमध्ये रॉकेलचा पुरवठाच झालेला नाही, असा आरोप नागरिकांकडून होत आहे. विशेष म्हणजे, गॅसचा वापर वाढल्यानंतर ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांनी स्टोव्ह, कँदील यांसारखी साधने अडगळीत टाकली किंवा भंगारात विकून टाकली आहेत. अशा परिस्थितीत ना वेळेवर गॅस मिळत आहे, ना सरकारने जाहीर केलेले रॉकेल उपलब्ध होत असल्याने ग्रामीण नागरिक दुहेरी संकटात सापडले आहेत. सरकारने केवळ घोषणा न करता तात्काळ प्रभावी अंमलबजावणी करून हदगाव तालुक्यासह ग्रामीण भागात नियमित रॉकेल पुरवठा करावा, अशी मागणी आता नागरिकांकडून जोर धरू लागली आहे.

## पुरवठा विभागाचा भार प्रभारीवर

हदगाव तालुक्यात रॉकेलचा किती कोटा आहे, प्रत्येक राशन दुकानावर कशाप्रकारे पुरवठा करण्यात येईल, त्यांच्याकडे क्षमता किती आहे याची माहिती घेण्यात येत आहे असं हदगाव तालुक्याचे तहसिल कार्यालयाचे प्रभारी पुरवठा अधिकारी खंदारे यांनी सांगितले. विशेष म्हणजे हदगाव तालुक्याला अद्यापही कायमस्वरूपी पुरवठा अधिकारी नाही हे उल्लेखनीय.

# विवाहितेचा छळ करणाऱ्या पतीसह दिराला तीन वर्षांची सक्तमजुरी

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड येथील भाग्यनगर पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या विवाहितेच्या छळ व आत्महत्येच्या प्रकरणात जिल्हा व सत्र न्यायालयाने पती आणि दिराला दोषी ठरवत प्रत्येकी तीन वर्षे सक्तमजुरीची शिक्षा सुनावली.

रेश्मा वसीम यांचा विवाह २००४ मध्ये राहुल कॉलनी, नांदेड येथील सरफराज अहमद यांच्याशी झाला होता. विवाहानंतर काही काळ सर्व काही सुरळीत होते. मात्र नंतर पती सरफराज अहमद, दिर नय्यर हुसेन तसेच इतर नातेवाईकांनी माहेरहून एक लाख रुपये आणण्याची मागणी करत रेश्मा यांना मानसिक व शारीरिक त्रास देण्यास सुरुवात केली. सततच्या छळाला कंटाळून रेश्मा यांनी २४ डिसेंबर २०१८ रोजी गळफास घेवून आत्महत्या केली. या प्रकरणी रेश्मा यांच्या भावाने भाग्यनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. सहाय्यक पोलीस निरीक्षक रेवाख उगमले यांनी तपास पूर्ण करुन न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले. सरकार पक्षातर्फे जिल्हा सरकारी वकील रणजित देशमुख यांनी १३ साक्षीदार तपासून प्रभावी युक्तीवाद केला. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश नरेंद्र केवाळ ब्रह्मे यांनी आरोपी सरफराज अहमद यांना तीन वर्षे सक्तमजुरी व १० हजार रुपये दंड, तर नय्यर हुसेन यांना तीन वर्षे सक्तमजुरी व ५ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. दंड न भरल्यास अतिरिक्त कारावासाची तरतूद करण्यात आली.




नीट-यूजी २०२६ परीक्षेचा पेपर फुटल्याने लाखो विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या प्रकाराला कारणीभूत एनटीए व घोटाळेबाज केंद्र सरकारच्या विरोधात नांदेड जिल्हा एनएसयुआयच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र निदर्शने करण्यात आली. यावेळी एनएसयूआयचे जिल्हाध्यक्ष सुरज शिंदे, किरण पडलवार, डॉ.आदित्य सोंडारे, जगदीश पावडे यांच्यासह इतर कार्यकर्ते उपस्थित होते. (छाया:करणसिंह बैस)

# रोजगाराचा अभाव:महागाईचा भार आणि शेतीचे नुकसान;ग्रामीण भागातील परिस्थिती गंभीर

माहूर/प्रतिनिधी-ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांचे जीवन दिवसेंदिवस अधिक कठीण बनत चालल्याचे चित्र सध्या सर्वत्र दिसून येत आहे. वाढती महागाई, रोजगाराच्या संधींचा अभाव, शेतकऱ्यांचे आर्थिक संकट आणि वाढती व्यसनाधीनता यामुळे ग्रामीण समाजव्यवस्था मोठ्या अडचणीत सापडली आहे.

गॅस सिलिंडर, किराणा साहित्य, खाद्यतेल, भाजीपाला आणि इतर जीवनावश्यक वस्तूंच्या किमती सातत्याने वाढत असल्याने सामान्य कुटुंबांचे मासिक बजेट पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. हाताला पुरेसे काम नसल्याने अनेक कुटुंबांवर आर्थिक संकट ओढवले असून काही ठिकाणी उपासमारीची परिस्थिती निर्माण होत असल्याचेही बोलले जात आहे.ग्रामीण भागातील अनेक नागरिक बचत गट, पतसंस्था, बँका आणि खासगी फायनान्स कंपन्यांकडून घेतलेल्या कर्जाच्या ओझ्याखाली दबले गेले आहेत. वाढते हप्ते, उसनेवारी आणि आर्थिक ताण यामुळे कुटुंबांमध्ये मानसिक तणावाचे प्रमाण वाढताना दिसत आहे. शेतकरी वर्गालाही मोठ्या संकटाचा सामना करावा लागत आहे. उत्पादन खर्च वाढत असताना शेतीमालाला अपेक्षित बाजारभाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांची आर्थिक घडी विस्कळीत झाली आहे. विशेषतः वाढलेले खत-बियाण्यांचे खर्च आणि तीव्र उष्णतेमुळे पालेभाज्या व इतर पिकांचे होणारे नुकसान यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. कष्टाने पिकवलेल्या मालाला योग्य मोबदला मिळत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. सोबतच बेरोजगारी आणि आर्थिक अस्थिरतेमुळे ग्रामीण भागात व्यसनाधीनतेचे प्रमाणही वाढत असल्याची चिंता व्यक्त होत आहे. अनेक तरुण दारू, गुटखा तसेच इतर मादक पदार्थांच्या आहारी जात असल्याने त्यांच्या भविष्यासमोर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. व्यसनामुळे कुटुंबातील वातावरण बिघडत असून गावोगावी किरकोळ गुन्हेगारी आणि सामाजिक असुरक्षिततेत वाढ होत असल्याचे नागरिक सांगत आहेत. ग्रामीण भागातील ही गंभीर परिस्थिती लक्षात घेता शासनाने महागाई नियंत्रणासाठी प्रभावी उपाययोजना करणे, स्थानिक स्तरावर रोजगारनिर्मिती वाढविणे, शेतकऱ्यांना हमीभाव देणे तसेच व्यसनमुक्तीसाठी जनजागृती आणि युवकांसाठी सकारात्मक उपक्रम राबविण्याची गरज व्यक्त होत आहे. अन्यथा ग्रामीण समाज व्यवस्थेवरील संकट अधिक गडद होण्याची भीती नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

# होकर्णा येथे वीज पडून म्हैस ठार

मुखेड/प्रतिनिधी-दि. १३ व १४ मे रोजी रात्री मुखेड परिसर व तालुक्यात वादळी वाऱ्यासह झालेल्या विजेच्या गडगडाटाने मौजे होकर्णा शिवरातील नारायण विठ्ठल श्रीरामे यांच्या शेतामधील शेड शेजारी बांधलेल्या म्हैसीवर वीज पडून मयत झाली आहे. सदर घटना समजताच तहसील कार्यालयाच्या वतीने तलाठी यांनी जायमोक्यावर जाऊन पंचनामा केला आहे तसेच पशुवैद्यकीय अधिकारी यांना शवविच्छेदन करण्यास सांगितले आहे. वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे लग्न समारंभासाठी उभारण्यात आलेल्या मंडपाचे बरेच नुकसान झाले आहे. आज लग्नाचा शेवटचा दिवस असल्यामुळे चोहिकडे लग्न समारंभाची गर्दी दिसून येत होती.

# दहावीतील रंजीत राठोडला सर्व विषयांत मिळाले समान ३५ गुण

माडवी/प्रतिनिधी-दहावीच्या निकालात कोणाला किती जास्त टक्के पडले, याची चर्चा सर्वत्र सुरू असतानाच कनकीतांडा येथील एका विद्यार्थ्याने मात्र आपल्या आगळ्यावेगळ्या निकालाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. रंजीत रितेश राठोड या विद्यार्थ्याने दहावीच्या सर्व सहा विषयांत प्रत्येकी ३५ गुण मिळवत चक्क 'काटावर' पास होण्याचा दुर्मिळ योगायोग साधला आहे.



पळशी येथील सुमन सुधाकरराव नाईक विद्यालयाचा विद्यार्थी असलेल्या रंजीतने यंदा दहावीची परीक्षा दिली होती. निकाल जाहीर झाल्यावर जेव्हा त्याने आपली गुणपत्रिका पाहिली, तेव्हा त्याला आणि त्याच्या मित्रांना आश्चर्याचा धक्का बसला. रंजीतला मराठी, हिंदी, इंग्रजी, गणित, विज्ञान आणि समाजशास्त्र या सहाही विषयांत ३५ पैकी ३५ गुण मिळाले आहेत. प्रत्येक विषयात गुण ३५, एकूण गुण १७५/५००, एकूण टक्केवारी ३५.००% अभ्यासात नियमितता असलेल्या रंजीतच्या या निकालाने सध्या परिसरात मोठी चर्चा रंगली आहे. सर्वच विषयांत काटावर पास होण्याचे हे यश सोशल मीडियावरही कौतुकाचा आणि कुतूहलाचा विषय ठरत आहे.कोणत्याही विषयात एकही गुण कमी नाही की जास्त नाही, अशा या 'बॅलन्स्ड' निकालामुळे रंजीत राठोड सध्या मांडवी परिसरात चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे. त्याने मिळवलेल्या या युनिक यशामुळे त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# जिल्ह्यात एका महिन्यात तब्बल ३६ बालविवाह रोखण्यात प्रशासनाला यश

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड जिल्ह्यात बालविवाहाच्या वाढत्या घटनांना आळा घालण्यासाठी महिला व बाल विकास विभागाने प्रभावी पावले उचलत गेल्या एका महिन्यात तब्बल ३६ बालविवाह थांबवण्यात यश मिळवले आहे. जिल्ह्यातील विविध भागांतून प्राप्त झालेल्या तक्रारींवर तातडीने कारवाई करत प्रशासनाने नियोजित बालविवाह रोखले असून, यामध्ये १०९८ या राष्ट्रीय आपत्कालीन बालसुरक्षा हेल्पलाईनची महत्त्वपूर्ण भूमिका ठरली आहे.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी गणेश वाघ यांच्या निर्देशानुसार ही मोहीम राबविण्यात आली. जिल्हा बाल संरक्षण अधिकारी श्रीमती विद्या आळणे, महिला व बाल विकास विभागातील कर्मचारी तसेच चाईल्ड लाईन १०९८ च्या पथकांनी समन्वयाने काम करत १२ एप्रिल ते १३ मे या कालावधीत प्राप्त झालेल्या तक्रारींवर त्वरित हस्तक्षेप केला. या कालावधीत जिल्ह्यात विविध ठिकाणी बालविवाह होत असल्याच्या तक्रारी १०९८ हेल्पलाईनवर प्राप्त झाल्या होत्या. त्यानंतर महिला व बाल विकास विभागाच्या विविध यंत्रणांच्या मदतीने समुपदेशन, जनजागृती आणि प्रत्यक्ष पडताळणीच्या माध्यमातून ३६ नियोजित बालविवाह थांबविण्यात आले. कारवाई दरम्यान तालुकास्तरा वरील बालविकास प्रकल्प अधिकारी, कनिष्ठ संरक्षण अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी तसेच अंगणवाडी सेविकांनी घटनास्थळी धाव घेतली. संबंधित वधू-वरांचे वय तपासून बालविवाह रोखण्यात आले. या हस्तक्षेपामुळे अल्पवयीन मुलामुलींच्या आयुष्यावर होणारे गंभीर परिणाम आणि कायदेशीर अडचणी टळल्या. विशेष म्हणजे, मागील दोन दिवसांतच जिल्ह्यात सहा बालविवाह थांबविण्यात आले आहेत. यामध्ये लोहा तालुक्यातील एक, नायगाव तालुक्यातील एक, कंधार तालुक्यातील दोन, बिलोली तालुक्यातील एक आणि उमरी तालुक्यातील एक अशा एकूण सहा घटनांचा समावेश आहे.

## जाहीर प्रगटन

मे.सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,कंधार यांचे न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१७९/२०२६
(CNR No.MHND100005982026)

अर्जदार -

| | | | |
|---|---|---|---|
| १ | प्रयागबाई भ्र.नाथराव केंद्रे | वय-७५ वर्षे | धंदा-घरकाम |
| २ | राधाबाई दिलीप केंद्रे | वय-४७ वर्षे | धंदा-घरकाम |
| ३ | संदिप दिलीप केंद्रे | वय-३० वर्षे | धंदा-शेती |
| ४ | सतिश पि.दिलीपराव केंद्रे अर्जदार क्र.१ ते ४ रा.वाखरडवाडी ता.कंधार जि.नांदेड | वय-२९ वर्षे | धंदा-शेती |
| ५ | पुजा भ्र.नारायण गुट्टे रा.थोडगावाडी ता.अहमदपुर जि.लातूर | वय-२६ वर्षे | धंदा-घरकाम |

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ चे कलम २-अे व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी वरील अर्जदार क्र.१ यांचा मुलगा व अर्जदार क्र.२ यांचे पती व अर्जदार क्र.३ ते ५ यांचे वडिल नामे दिलीप नाथराव केंद्रे हे होते ते दिनांक ०२/०४/२०२६ रोजी कंधार ता.कंधार जि.नांदेड येथे मयत झाले आहेत. वरील अर्जदाराचे म्हणणे आहे की, मयत दिलीप नाथराव केंद्रे यांचे अर्जदाराशिवाय इतर कोणीही वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना मयत दिलीप नाथराव केंद्रे यांचे वारस असलेबाबत शासकीय कामासाठी वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत दिलीप नाथराव केंद्रे यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख-२२/०६/२०२६

आज रोजी दि.०८/०५/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार

स्वाक्षरित/-
**सहायक अधिक्षक**
सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार

## जाहीर प्रगटन

मे.सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,कंधार यांचे न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१७८/२०२६
(CNR No.MHND100005972026)

अर्जदार -

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अजित पांडुरंग गुरुपवार | वय-३५ वर्षे | धंदा-शिक्षण |
| २ | दिक्षा पि.पांडुरंग गुरुपवार | वय-३२ वर्षे | धंदा-घरकाम |
| ३ | आदित्य पि.पांडुरंग गुरुपवार सर्व रा.अभिनवनगर कंधार ता.कंधार जि.नांदेड | वय-२९ वर्षे | धंदा-शिक्षण |

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ चे कलम २-अे व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार क्र.१ ते ३ यांची आई नामे इंदुताई विद्यासागर भंडारे ही होती ती दिनांक ११-४-२०१५ कंधार ता.कंधार येथे मयत झाले आहे. तसेच अर्जदार क्र.१ ते ३ यांचे वडील पांडुरंग बाबाराव गुरुपवार हे होते ते यापुर्वी दिनांक २४/०२/२०२५ रोजी मयत झाले आहेत. वरील अर्जदाराचे म्हणणे आहे की, मयत इंदुताई विद्यासागर भंडारे यांचे अर्जदाराशिवाय इतर कोणीही वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना इंदुताई विद्यासागर भंडारे यांचे वारस असलेबाबत शासकीय कामासाठी वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत इंदुताई विद्यासागर भंडारे यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख-२३/०६/२०२६

आज रोजी दि.०८/०५/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार

स्वाक्षरित/-
**सहायक अधिक्षक**
सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार

## CHANGE IN NAME

My old Name is **NIRMALKAUR JEETENDRASINGH KHEHRA** which now I am Changing as New Name **NIRMAL KAUR KHEHRA** Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same

Sign by
**NIRMAL KAUR KHEHRA**
Address: H. NO. 3-3-1134, Dashmesh Nagar,
Behind Ride Well Show Room Motors,
Dashmesh Nagar, NANDED
MAHARASHTRA - 431601
Mob 7020370071

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार कंधार यांचे कार्यालय

**(जन्म मृत्यु शाखा)**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्र.२०२५६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्रमांक २२३ ०२४६६ - दिनांक ०५/०५/२०२६

## जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार श्री.शादुल्ला पि.सिलेमान शेख रा.हाळदा ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा श्री. शादुल्ला पि.सिलेमान शेख रा.हाळदा ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यु प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होणे करीता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यु झालेल्यांचे नाव/शादुल्ला पि.सिलेमान शेख रा.हाळदा ता.कंधार जि.नांदेड या ठिकाणी दिनांक ०१/०३/१९८२ या दिवशी जन्म/मृत्यु झाला असुन प्रमाणपत्र मिळणे करीता आदेश होणे करीता सदर तहसिल कार्यालय कंधार येथे दिनांक २८/०४/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यु दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिध्द झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या तहसिल कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक-०५/०५/२०२६
स्थळ-कंधार

स्वाक्षरित/-
तहसिलदार कंधार

# धोबी समाज वधू-वर परिचय मेळाव्यासाठी जय्यत तयारी

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड येथे आयोजित करण्यात आलेल्या सर्व धोबी समाज वधू-वर परिचय मेळाव्याची जय्यत तयारी पूर्ण करण्यात आली असून रविवार, दि. २४ मे रोजी शिवाजीनगर येथील हॉटेल विसावा येथे हा मेळावा उत्साहात पार पडणार आहे. वधू-वर व त्यांच्या पालकांसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्थाही करण्यात आली असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.

या मेळाव्यात बाहेरगावाहून येणाऱ्या धोबी समाजातील मान्यवर, कीर्तनकार तसेच नांदेड येथील विविध समाजातील पत्रकारांचा नॅशनल धोबी महासंघाच्या वतीने सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र देऊन गौरव करण्यात येणार आहे. पत्रकार व कीर्तनकारांनी पूर्वनोंदणी करून घ्यावी, असे आवाहन नॅशनल धोबी महासंघाचे सोशल मीडिया प्रदेशाध्यक्ष संतोषजी औंढेकर तसेच मेळाव्याचे स्वागताध्यक्ष डॉ. पांडुरंग इभुतवार व डॉ. सौ. आशाताई पी. इभुतवार यांनी केले आहे.धोबी समाजातील युवक-युवतींना योग्य जोडीदार मिळावा, समाजात एकोप्याची भावना वृद्धिंगत व्हावी आणि सामाजिक बांधिलकी अधिक दृढ व्हावी, या उद्देशाने या वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मेळावा यशस्वी करावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.या आवाहनाला नॅशनल धोबी महासंघाचे राज परदेशी (पुणे), हरीश मस्के (अकोला), वामनराव पेनूरकर (नांदेड), संतोषजी औंढेकर, कोंडिबा मांजरमकर, मार्तंड भंडारे, प्रमोद भंडारे, बाबुराव कलुरे, पिंटू मारवाडीकर, राजू येवले, करण तेलंग, शिवाजी काकांडीकर, गोविंदराव कुंटूरकर, मुत्तेपवार, एस. जी. माचनवार, वामन शिंदे (नाशिक), प्रवीण धुराटकर (अमरावती), सौ. रेखाताई पाटील (नागपूर) आणि विपीन रजक (पुणे) आदींचा पाठिंबा लाभला आहे.

# सचिवांचा हलगर्जीपणा:सेवा सोसायटीचे चेअरमन जिल्हा बँकेच्या मतदानापासून वंचित?

## तबब्ल १४ आक्षेप दाखल!;राजकीय दबावाखाली मतदानापासून रोखल्याचा आरोप

माहूर/प्रतिनिधी-सेवा सहकारी सोसायटीच्या सचिवांच्या निष्काळजीपणा, मनमानी कारभार आणि कथित राजकीय दबावामुळे संबंधित संस्थांचे चेअरमन व संचालकांना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या मतदान प्रक्रियेतून वंचित राहावे लागल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या पार्श्वभूमीवर माहूर तालुक्यातील तब्बल १४ मतदारांनी अंतिम मुदतीपूर्वी, म्हणजेच १३ मे रोजी अधिकृत आक्षेप दाखल केले आहेत. या प्रकरणावर आज शुक्रवार, लातूर येथे सुनावणी होणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित सेवा सोसायट्यांवर कथित थकीत कर्ज असल्याचे कारण पुढे करत काही चेअरमन व संचालकांना मतदानासाठी अपात्र ठरविण्यात आले. मात्र, याबाबत सचिवांनी संबंधित पदाधिकाऱ्यांना कोणतीही लेखी नोटीस, पूर्वसूचना किंवा खुलासा करण्याची संधी दिली नसल्याचा गंभीर आरोप करण्यात येत आहे. सहकार क्षेत्रातील सत्ताधारी मंडळींच्या राजकीय दबावाखाली जाणीवपूर्वक माहिती लपवून ठेवण्यात आल्याने लोकशाही हक्कांवर गदा आल्याची भावना संबंधित मतदारांमध्ये व्यक्त होत आहे. नियमानुसार, कोणतीही थकबाकी असल्यास संबंधित पदाधिकाऱ्यांना वेळेत नोटीस देणे व त्यांची बाजू ऐकून घेणे आवश्यक असताना सचिवांनी ती जबाबदारी पार पाडली नसल्याचा आरोपही होत आहे.दरम्यान, अंजनखेड सेवा सोसायटीमध्ये कोणतीही थकबाकी नसतानाही राजकीय दबावामुळे ज्योतिबा खराटे यांना मतदानापासून वंचित ठेवण्यात आल्याचा आरोप पुढे आला आहे. त्यामुळे हा प्रकार केवळ प्रशासकीय हलगर्जीपणा नसून हेतुपुरस्सर कारवाई असल्याची चर्चा सहकार क्षेत्रात रंगू लागली आहे.या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित सचिवांवर कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच दोषींवर सहकारी कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी मागणी संस्थेतील सभासद व पदाधिकाऱ्यांकडून करण्यात येत आहे. या घटनेमुळे सहकार क्षेत्रातील पारदर्शकता आणि लोकशाही प्रक्रियेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून वरिष्ठ सहकार अधिकाऱ्यांनी तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी अन्यायग्रस्त मतदारांनी केली आहे. दि.१५ मे रोजी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था कार्यालय येथे या प्रकरणाची सुनावणी होणार असल्याची माहिती अंजनखेड सेवा सोसायटीचे ज्योतिबा खराटे यांनी दिली. तसेच विभागीय स्तरावर न्याय न मिळाल्यास मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात दाद मागणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# ग्रामविकास विभागाची धुरा डॉ.चंद्रकांत पुलकुंडवारांकडे

मुंबई/प्रतिनिधी-राज्य शासनाच्यावतीने पुणे विभागाचे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांची ग्रामविकास आणि पंचायत राज विभागाच्या सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे.



ग्रामीण विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या या विभागाची जबाबदारी आता अनुभवी अधिकाऱ्यांकडे गेल्याने विविध योजनांच्या अंमलबजावणीला गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. याशिवाय क्रीडा व युवक कल्याण आयुक्त शीतल तेली-उगले यांची बदली पुणे विभागीय आयुक्तपदी करण्यात आली असून त्यांच्या जागी दीपक सिंगला यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच गोंदिया जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मुरुगानंथम एम. यांची नागपूर महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्तपदी बदली करण्यात आली आहे.डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार हे महाराष्ट्र केडरमधील अनुभवी आणि कार्यक्षम सनदी अधिकारी म्हणून ओळखले जातात. यापूर्वी त्यांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नाशिक महानगरपालिकेचे आयुक्त, एमएसआरडीसीचे सह-व्यवस्थापकीय संचालक तसेच साखर आयुक्त या महत्त्वाच्या पदांवर काम करताना प्रशासनात आपली वेगळी छाप पाडली आहे. साखर आयुक्त म्हणून कार्यरत असताना त्यांनी ऊस उत्पादक शेतकरी आणि साखर उद्योगाशी संबंधित अनेक गुंतागुंतीचे प्रश्न प्रभावीपणे हाताळले होते.

## ना.हेमंत पाटलांच्या पाठपुराव्याला यश

# किनवटमध्ये ज्वारी-मका खरेदी केंद्र सुरु होणार

किनवट/प्रतिनिधी-किनवट तालुक्यातील शेतकऱ्यांची ज्वारी व मक्याची हमी भावाने खरेदी करण्यासाठी शासनाने १९ मे पासून ऑनलाईन नोंदणी केलेल्या ज्वारी आणि मका उत्पादक शेतकऱ्यांच्या भरडधानयाच्या प्रत्यक्ष खरेदी केंद्र सुरु करण्यात येणार आहे. ना.हेमंत पाटील यांनी थेट मंत्र्यांपासून ते किनवटच्या तहसीलदारांपर्यंत पाठपुरावा केल्यानंतर या कार्यवाहीला गती मिळाली आहे.

१ मे पासून ३० जून पर्यंत आधारभूत हमी भाव योजने अंतर्गत ज्वारी आणि मका या भरडधान्याच्या खरेदीची तिथी निश्चित करण्यात आली होती परंतु ऐनवेळी कुठे माशी शिंकली पत्ता नाही पण १५ मे उजाडला तरी खरेदीच्या नावे शुन्यच दिसल्याने बोधडी खुर्द येथील सदन शेतकरी उद्धवराव मुंडे, वाळकी-बोधडी बु. येथील शिवाजीराव दराडे यांनी आमदार/मंत्री हेमंत पाटील यांचे किनवट येथील जनसंपर्क कार्यालय समन्वयक तथा नांदेड जिल्हा दिशा समितीचे माजी सदस्य मारोती सुंकलवाडांशी संपर्क केला. आ.पाटलांनी मंत्री ते तहसीलदार यांच्याशी पाठपुरावा केल्यानंतरच तहसीलदार डॉ.शारदा चोंडेकरांनी ईस्लापूरात गोडाऊन उपलब्ध करून खरेदी सुरू करण्यासाठी आवश्यक बाबी सोमवारपर्यंत पूर्ण करून शक्यतो त्याच दिवशी अथवा मंगळवारी प्रत्यक्ष भरडधान्य खरेदीला सुरुवात होणार असल्याचे सूत्रांनी सांगितले. दरम्यान शेतकरी आणि प्रशासन यांच्या समन्वयाने प्रक्रिया पार पाडण्यासाठी स्थानिक आदिवासी विकास महामंडळाच्या उपप्रादेशिक व्यवस्थापक कार्यालयात शेतकऱ्यांच्या साक्षीने पत्रकार अरुण तम्मडवार आणि पत्रकार बी.एल.कागणे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. उन्हात व रात्री अनवाणी अवस्थेतील शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ड.सुनिल येरेकार, शिवसेनेचे करण एंड्रलवार, नगरसेवक प्रशांत कोरडे यांच्यासह अनेकांचे योगदान दिसून आले होते.

# मोटरगा येथे वीज पडून दोन बैल ठार;शेतकरी आर्थिक संकटात

मुखेड/प्रतिनिधी-तालुक्यातील मोटरगा येथे काल रात्री झालेल्या अवकाळी पावसामुळे येथील शेतकरी बाबु लिंगुराम आईलवाड यांचे २ दोन बैल विज पडून ठार झाले आहेत.या घटनेमुळे पेरणीचे दिवस जवळ येत असतांना ऐन मशागतीच्यावेळी दोन बैलांचा जीव गेल्याने शेतकऱ्यांवर आर्थिक संकट कोसळले आहे.



दिवसेंदिवस शेतकऱ्यांवरील संकट काही थांबायचे नाव घेत नाही. सध्या कडक उन्हाळा असला तरी नेहमी विजेच्या गडगडाटासह अवकाळी पाऊस येत आहे. या पावसामुळे लग्न सोहळ्यात विघ्ने येत आहेत. शेतकऱ्यांना मदतीला धावून येणारे सर्जा-राजा मरण पावत असल्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडत आहेत. बैलाशिवाय शेती होत नाही अन् बैलावरच विज पडून ठार होत असल्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. सरकारी काम अन सहा महिणे थांब या उक्तीप्रमाणे अशा घटनाचा पंचनामा कधी व्हावा अन् शेतकऱ्यांच्या पदरात नुकसान भरपाई कधी मिळावी. तेव्हा लवकरात लवकर आर्थिक मदत करण्यात यावी अशी मागणी शेतकरी वर्गातून केली जात आहे.

पान १ वरुन

### राजू शेट्टींना फरफटत...

आंदोलक करणारे शेतकरी चांगलेच आक्रमक झाल्याचं दिसून आलं.या वर्षी कोकणातील आंबा आणि काजू उत्पादक शेतकऱ्यांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचं दिसून आलं. त्यावर सरकारने त्यांना केवळ २२ हजारांची मदत जाहीर केली. त्यानंतर काजू आणि आंबा उत्पादक शेतकरी आक्रमक होत त्यांनी मुंबईत आंदोलन केलं. गिरगाव चौपाटीपासून मुख्यमंत्री निवासस्थान वर्षा बंगल्याकडे हा मोर्चा काढण्यात येणार होता.

# पुढील वर्षापासून नीट परीक्षा संगणकाधारित; शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांची मोठी घोषणा

नवी दिल्ली:नीट-पुढील वर्षापासून नीट परीक्षा पूर्णपणे संगणक-आधारित पद्धतीने घेण्यात येईल अशी घोषणा केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी एका पत्रकार परिषदेद्वारे केली आहे. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी कोणतीही तडजोड केली जाणार नसून परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता आणि सुरक्षितता वाढविण्यासाठी हा निर्णय घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

धर्मेंद्र प्रधान म्हणाले की, विद्यार्थ्यांचे हित आणि त्यांचे भविष्य सुरक्षित ठेवणे हे सरकारचे सर्वोच्च प्राधान्य आहे. काही लोक सोशल मीडियावर चुकीची माहिती पसरवत आहेत. मात्र सरकार कोणतीही अनियमितता खपवून घेणार नाही. नीट-यूजी परीक्षा मूळतः ३ मे रोजी घेण्यात आली होती. मात्र, प्रश्नपत्रिका फुटल्याच्या आरोपांनंतर नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) आणि केंद्र सरकारने तातडीने चौकशी सुरू केली. ७ मे रोजी एनटीएकडे काही प्रश्न अंदाजपत्रिकामधून आल्याची तक्रार प्राप्त झाली होती. त्यानंतर शासकीय यंत्रणांशी समन्वय साधून तपास करण्यात आला. चौकशीत पेपरफुटीचे संकेत स्पष्ट झाल्यानंतर १२ मे रोजी परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला.शिक्षणमंत्र्यांनी सांगितले की, शिक्षण माफियांच्या कटामुळे गुणवंत विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये, यासाठी सरकारने कठोर भूमिका घेतली आहे. या संपूर्ण प्रकरणाचा तपास सीबीआयकडे सोपविण्यात आला असून दोषींवर कठोर कारवाई केली जाईल. पुनर्परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना त्यांच्या पसंतीचे परीक्षा केंद्र शहर निवडण्यासाठी एक आठवड्याची मुदत दिली जाणार आहे. तसेच परीक्षेची प्रवेशपत्रे १४ जूनपर्यंत जारी करण्यात येणार असल्याची माहितीही देण्यात आली.

# ज्येष्ठ मानसोपचार तज्ज्ञ डॉ.आनंद नाडकर्णी यांचे निधन

मुंबई/प्रतिनिधी-मानसिक आरोग्याविषयी समाजात जागरूकता निर्माण करणारे ज्येष्ठ मानसोपचारतज्ज्ञ, लेखक आणि सामाजिक विचारवंत डॉ. आनंद नाडकर्णी यांचे शुक्रवारी सकाळी निधन झाले. ते ६८ वर्षांचे होते. मागील काही दिवसांपासून मुंबईतील एका खासगी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते. त्यांच्या निधनामुळे वैद्यकीय, साहित्यिक आणि सामाजिक क्षेत्रात शोककळा पसरली आहे.



मानसिक आरोग्याबाबत समाजात असलेल्या गैरसमजुती दूर करण्यासाठी आणि मनोविकारांविषयी सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करण्यासाठी डॉ. नाडकर्णी यांनी आयुष्यभर कार्य केले. त्यांनी २३ मार्च १९९० रोजी ठाणे येथे आयपीएच अर्थात इन्स्टिट्यूट फॉर सायकॉलॉजिकल हेल्थ या संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून मानसिक आरोग्य जनजागृती, समुपदेशन, उपचार आणि सामाजिक प्रबोधनाचे व्यापक कार्य त्यांनी उभारले. लेखक, कवी, नाटककार, संगीतकार, चित्रकार आणि सामाजिक कार्यकर्ते अशी त्यांची बहुआयामी ओळख होती.डॉ. आनंद नाडकर्णी यांच्या पश्चात पत्नी आणि मुलगा असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर ठाण्यात अंत्यसंस्कार करण्यात येणार असल्याची माहिती कुटुंबीयांनी दिली.

# माष्टी गावात शांतता समितीची बैठक;सामाजिक सलोखा राखण्याचे प्रशासनाचे आवाहन



कुंडलवाडी/प्रतिनिधी-कुंडलवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मौजे माष्टी येथे दि. ८ मे २०२६ रोजी दोन समाजांमध्ये झालेल्या वादानंतर परस्परांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले होते. या घटनेमुळे गावात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीवर गावात शांतता, सामाजिक सलोखा आणि कायदा-सुव्यवस्था कायम राखण्यासाठी दि.१४ मे २०२६ रोजी ग्रामपंचायत कार्यालयात महत्त्वपूर्ण शांतता समिती व सामाजिक सलोखा बैठक आयोजित करण्यात आली.

ही बैठक भोकर विभागाच्या अप्पर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी धर्माबादच्या तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी सुरेखा स्वामी, गटविकास अधिकारी क्षीरसागर, उपविभागीय पोलीस अधिकारी दशरथ पाटील, कुंडलवाडीचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे तसेच पोलीस उपनिरीक्षक गजेंद्र मांजरमकर यांची प्रमुख उपस्थिती होती.बैठकीदरम्यान गावातील विविध मूलभूत व प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. विशेषतः स्मशानभूमीचा प्रश्न, स्वच्छ आर.ओ. पिण्याच्या पाण्याची सुविधा, बौद्ध विहारासाठी जागा उपलब्ध करून देणे, तसेच दलित वस्तीत पिठाच्या गिरणीची सुविधा उभारण्यासंदर्भातील मागण्यांवर प्रशासनाने दोन्ही समाजातील नागरिकांशी संवाद साधला.या बैठकीस गावातील दोन्ही समाजांतील पुरुष व महिला नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दोन्ही गटांमध्ये दाखल झालेल्या गुन्ह्यांच्या अनुषंगाने प्रशासनाने गावकऱ्यांना कायदेशीर मार्गाने प्रश्न सोडविण्याचे आवाहन केले. कोणतीही अडचण किंवा तक्रार असल्यास कायदा हातात न घेता पोलीस प्रशासन किंवा संबंधित विभागाकडे रितसर तक्रार करावी, अशा सूचना उपस्थित अधिकाऱ्यांनी दिल्या.बैठकीमुळे गावातील वातावरण शांततापूर्ण ठेवण्यासाठी सकारात्मक संदेश गेल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

पान १ वरुन

### बेताल वक्तव्य खपवून...

तीन वर्षांपासून सुनावणीची प्रतीक्षा करत आहोत, असे त्यांनी सांगितले. राज्य सरकारच्या वतीने ज्येष्ठ वकील मुकुल रोहतगी यांनीही न्यायालयाने सर्व पक्षांशी संयमाने वागल्याचे सांगितले. कोणत्याही बाजूच्या नेत्यांना किंवा पक्षकारांना न्यायालयाबाबत अशा प्रकारची वक्तव्ये करण्याचा अधिकार नाही, असे ते म्हणाले. सरन्यायाधीशांनी न्यायालयावर मोठा कामाचा ताण असल्याचे नमूद करत, आम्ही रोज सायंकाळी चार वाजेपर्यंत बसून काम करत असतो. आम्ही रिकामे बसलेलो नाही. सर्व प्रकरणे एकाच दिवशी ऐकली जाऊ शकत नाहीत, असे स्पष्ट केले.

### मान्सून केरळात...

मराठवाडा, विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये नागरिक उकाड्याने त्रस्त झाले आहेत. अशा परिस्थितीत मान्सून लवकर दाखल होणार असल्याने नागरिकांना उष्णतेपासून काहीसा दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.हवामान विभागाच्या माहितीनुसार, पुढील ४८ तासांत दक्षिण अंदमान समुद्र, बंगालचा उपसागर आणि अंदमान-निकोबार बेट परिसरात मान्सूनसाठी अनुकूल वातावरण तयार होत आहे. १६ मेच्या सुमारास मान्सून अंदमान परिसरात सक्रिय होण्याची शक्यता आहे. त्यानंतर तो वेगाने पुढे सरकत केरळ किनारपट्टी गाठेल.

### किनवटमध्ये अवैध गौणखनिज...

दंडात्मक कारवाई नको, फौजदारी कारवाई करुन मंत्र्यांनी दिलेल्या आदेशाला पळवाटा न काढता अंमलबजावणी करायला कोणी हात धरले तुमचे.

**महसूल बुडवणारे दोन तहसीलदार निलंबित मग किनवटच्या तहसीलदारांवर कोणाचा वरदहस्त?**

तहसीलदार डॉ.शारदा चोंडेकर यांच्या कारभारावर नाराज असलेल्या आमदार भीमराव केरामांनी थेट महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे मंत्रालय भेटीत तक्रार दिल्यानंतर विभागीय चौकशी आणि इस्लापूर येथील नियोजित पेट्रोल पंपाच्या जमिनी संदर्भात लाच प्रकरणी किनवट उपविभागीय अधिकाऱ्यांच्या चौकशीचा फेरा लागला होता. गौण खनिजांच्याही कामात तक्रारी करण्यात आल्या परंतु त्यांच्यावर अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही. वसमत तालुक्याचे तहसीलदार शारद दळवी आणि सिरोंचा तालुक्याचे तहसीलदार नीलेश होणमोरे यांच्याविरुद्ध जो ठपका ठेवून कारवाई केली. त्यापेक्षा किनवटचे चित्र वेगळे नाही मग कारवाई का केली जात नाही, कोणाचा वरदहस्त त्यांना तारणहार ठरतोय? असा वैतागलेल्या नागरीकांचा सवाल आहे. रात्रंदिवस अवैध रेती, मुरुम या सारख्या गौण खनिजाचा व्यवसाय चालतो. शेकडो ट्रॉलीऑटो, शंभरच्या आसपास ट्रॅक्टर चालतात. हायवांसह जमेल त्या वाहानातून गौण खनिजाची वाहतूक होते पण तक्रार करुनही जाणीवपूर्वक कारवाईला टाळले जात असल्याचा लोकांचा आरोप आहे. पांधरा ग्रामस्थांचे आंदोलन हे त्या गौण खनिजाचा जाणीवपूर्वक महसूल बुडवल्याची साक्ष देणारे ठरले आहे. जिल्हा अधिकाऱ्यांपासून ते मंत्री बावनकुळेंना आणखी किती पुराव्यांची गरज आहे ? असा सवाल आहे.

# राष्ट्रवादीत पडद्यामागे खलबते?

## सुनेत्रा पवारांच्या निकटवर्तीयाची प्रफुल पटेलांशी भेट

मुंबई/प्रतिनिधी-राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सुरू असलेल्या अंतर्गत नाराजीच्या चर्चांदरम्यान शुक्रवारी महत्त्वपूर्ण राजकीय घडामोड घडली. सुनेत्रा पवार यांचे निकटवर्तीय मानले जाणारे प्रमोद हिंदुराव यांनी ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल यांची भेट घेतली. या भेटीनंतर पक्षातील पडद्यामागील हालचालींना वेग आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

सुनेत्रा पवार आणि त्यांच्या दोन्ही पुत्रांनी पक्षाची सूत्रे हातात घेतल्यानंतर प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांना संघटनेच्या मुख्य प्रवाहापासून दूर ठेवण्यात आल्याची चर्चा सध्या जोर धरत आहे. नव्या पदाधिकाऱ्यांच्या यादीत प्रफुल पटेल यांना महत्त्वाची जबाबदारी न मिळाल्याने पक्षातील आर्थिक व संघटनात्मक नियंत्रण सुनेत्रा पवार यांच्या गटाकडे केंद्रीत झाल्याचे बोलले जात आहे.याच पार्श्वभूमीवर प्रमोद हिंदुराव आणि प्रफुल पटेल यांच्यात झालेली भेट महत्त्वाची मानली जात आहे. पक्षातील नाराजी दूर करण्यासाठी संवाद सुरू झाला आहे का, की आगामी राजकीय बदलांची ही नांदी आहे, याबाबत तर्कवितर्क लढवले जात आहेत.दरम्यान, काही दिवसांपूर्वीच सुनील तटकरे यांनी सिल्व्हर ओक येथे जाऊन शरद पवार यांची भेट घेतली होती. या भेटीनंतर शरद पवार यांनी पत्रकार परिषदेत प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे यांच्या क्षमतेचे कौतुक केले होते.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४